## प्रेसनोट

दिनांक :— १५.०७.२०२२

आलोसे १) श्री उमेश बापुराव कोठीकर, वय ५२ वर्षे,व्यवसाय नौकरी, मुख्याधिकारी, नगर परीषद हिंगोली रा. चिंतामणी पार्क,कोथरूड,पुणे, ह.मु.रा. एन.टी.शि. जैन प्लाझा मेडीकल समोर हिंगोली २) श्री.मंहमद जाकेर हुसेन अहेमद हुसेन, वय ५७ वर्षे, व्यवसाय नौकरी, वरीष्ठ लिपीक, नगर परीषद हिंगोली, रा. भोईगल्ली कळमनुरी ३) श्री.राहुल विजय जाधव, वय ३१ वर्षे, व्यवसाय नौकरी, लेखापाल, नगर परीषद हिंगोली रा. व्दारका नगर, बुलढाणा, ह.मु. एन.टी.सी. तारा अपार्टमेंट, २ रा. मजला हिंगोली यांचे विरूध्द ४०,०००/—रू. च्या लाचेची मागणी करून ती रक्कम आलोसे क्र.२ व ३ यांचेहस्ते स्विकारल्या प्रकरणी गुन्हा करण्याची प्रक्रिया चालु आहे.

---

यातील पिडीत तक्रारदार पुरूष वय ५१ वर्ष, यांनी दिनांक १५.०७.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली येथे तक्रार दिली होती की, तक्रारदार यांचा मुलगा यांनी नगर पषिद कळमनुरी येथील सिमेंट रोड व पेव्हर ब्लॉकच्या पाच कामाचे नियमा प्रमाणे निविदा भरून दिनांक २५.०५.२०२२ रोजी कामाचे कार्यरंभ आदेश घेउन सदरचे काम पुर्ण केले आहे. त्या पाच कामा पैकी दोन कामाचे बिल नगर पषिद कळमनुरी यांचे कडुन मंजुर होवुन मिळाले असुन तिन कामाचे बिल मंजुर होवुन मिळणे बाकी आहे. त्या तिन कामा पैकी कार्यरंभ आदेश क्रमांक १२९४ चे बिलाची रक्कम ८,०४,६११/— रूपये मंजुर करून चेक देण्यासाठी नगर पषिद कळमनुरी येथील मुख्याधिकारी श्री उमेश कोठीकर हे बिलाचे रक्कमेच्या पाच टक्के रक्कम म्हणजेच ४०,०००/—रूपये लाचेची मागणी करीत असुन त्यांचेवर कायदेशिर कार्यवाही करावी अशी तक्रार दिली होती.

त्यावरून अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी दोन शासकिय पंचा समक्ष दिनांक १४.०७.२०२२ रोजी बोलावुन तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी केली असता यातील तक्रारदार हे आलोसे यांचे राहते घरी तापडीया ईस्टेट, एनटीसी हिंगोली येथे त्यांची भेट घेण्या करीता पंच क्र. १ यांचेसह गेले असता उमेश कोठीकर, मुख्याधिकारी,नगर परीषद कळमनुरी यांचेशी पंच क्र. १ यांचे समक्ष भेट झाली होती. तेव्हा उमेश कोठीकर, मुख्याधिकारी, नगर पषिद कळमनुरी यांनी तक्रारदार यांना बिलाचे रक्कमेच्या पाच टक्के रक्कम म्हणजेच ४०,०००/—रूपय लाचेची मागणी केली.

तक्रारदार यांचेकडे ४०,०००/—रू. लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम दि.१५.०७.२०२२ रोजी स्विकारण्यास सहमती दर्शविली. त्यावरून दि.१५.०७.२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे क्र. १) श्री उमेश बापुराव कोठीकर, वय ५२ वर्षे,व्यवसाय नौकरी, मुख्याधिकारी, नगर परीषद हिंगोली यांनी सदर लाचेची रक्कम ४०,०००/—रू. नगर परीषद कार्यालय, कळमनुरी येथील क्र.२) श्री.मंहमद जाकेर हुसेन अहेमद हुसेन, वय ५७ वर्षे, वरीष्ठ लिपीक, नगर परीषद हिंगोली, रा. भोईगल्ली कळमनुरी व क्र. ३) श्री.राहुल विजय जाधव, वय ३१ वर्षे, व्यवसाय नौकरी, लेखापाल, नगर परीषद हिंगोली, यांचे मार्फतीने स्विकारली आहे.

त्यावरून आलोसे १) श्री उमेश बापुराव कोठीकर, वय ५२ वर्षे,व्यवसाय नौकरी, मुख्याधिकारी, नगर परीषद कळमनुरी, २) श्री. मंहमद जाकेर हुसेन अहेमद हुसेन, वय ५७ वर्षे, व्यवसाय नौकरी, वरीष्ठ लिपीक, नगर परीषद कळमनुरी, ३) श्री.राहुल विजय जाधव, वय ३१ वर्षे, व्यवसाय नौकरी, लेखापाल, नगर परीषद कळमनुरी यांचे यांचे विरूध्द पोलीस स्टेशन कळमनुरी येथे कलम ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

हि कामगिरी डॉ. श्री राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, अपर पोलीस अधिक्षक श्री.धरमसिंग चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली युनिट येथील श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली, पो.नि. श्री. प्रफुल्ल अंकुश्कर, पो.नि.श्री. विजय पवार, सपोउपनि/युनुस सिध्दीकी, पोह/विजय उपरे, पोना/ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना/तान्हाजी मुंढे, पोशि/राजाराम फुपाटे, मपोना/योगीता आवचार, चापोना/हिम्मतराव सरनाईक ला.प्र.वि. हिंगोली यांनी केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास श्री प्रफुल्ल अंकुश्कर, पोलीस निरीक्षक, हिंगोली हे करीत आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२४५६—२२३०५५,

श्री. डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,नांदेड मो.नं. ९६२३९९९९४४

श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि ,हिंगोली मो. ने.९८२२२००९५९